**L. A. BILL No. II OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २.

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५९ चा ३. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी २६८२—१ (४५०-२-२०२३)

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १६३ मध्ये, पोट-कलम (१) मधील,— १९५९ चा ३.

(अ) खंड (१) मधील, " पराकाष्ठा एक महिना मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा तीनशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील " या मजकुराऐवजी, " एक हजार पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) खंड (२) मधील, " पराकाष्ठा सहा महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा पाचशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

व्यवसाय करणे सुसह्य होण्याच्या व नागरिकांचे जीवन सुसह्य करण्याच्या उद्देशाने, किरकोळ उल्लंघन केल्याबद्दल नागरिकांना कारावास होण्याची जोखीम दूर करण्यासाठी, राज्य शासनाने, केंद्र शासनाच्या विनंतीवरून, सर्व राज्य अधिनियमांचे व त्याखाली केलेल्या नियमांचे व्यापक पुनर्विलोकन हाती घेतले आहे.

**२.** वरील प्रयोजनांसाठी, संबंधित प्रशासकीय विभागांशी आणि त्याखालील प्राधिकरणांशी किंवा संस्थांशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र राज्य अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांमधील कारावासाच्या विद्यमान तरतुदी वगळण्याची किंवा सौम्य करण्याची अथवा अपराधांची आपसमेळ करण्यासाठी तरतूद करण्याची शिफारस करण्यासाठी, राज्य शासनाने, अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली सचिवांची एक समिती घटित केली होती.

त्यानुसार, असे पुनर्विलोकन केल्यानंतर, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याच्या कलम १६३ मधील पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या कारावासाच्या व दंडाच्या तरतुदींमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,<br>दिनांक २६ फेब्रुवारी २०२३.

**गिरीश महाजन,**<br>ग्रामविकास मंत्री.

**सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक २–महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यातील उतारे)**

**(सन १९५९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)**

**१** ते **१६२.** * * * *

रस्त्यावर गुरे भटकू देण्याबद्दल किंवा खाजगी अथवा सार्वजनिक मालमत्तेवर त्यांना अतिक्रमण करू देण्याबद्दल.

**१६३.** (१) जो कोणी एखाद्या गावाच्या सीमेत, त्याच्या मालकीची किंवा त्याच्या ताब्यातील गुरे कोणत्याही रस्त्यावर भटकू देईल किंवा कोणत्याही खाजगी अथवा सार्वजनिक मालमत्तेवर त्यांना अतिक्रमण करू देईल त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर––

(एक) पहिल्या अपराधाबद्दल, एक महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा तीनशे रुपयापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(दोन) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधाबद्दल, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) ते (४) * * * *

**१६४.** ते **१८८.** * * * *

**अनुसूची** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २.]**

**[महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. गिरीश महाजन,**
ग्रामविकास मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई